# महाराष्ट्र विधानसभा

## दुसरे अधिवेशन, २०१५

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**सोमवार, दिनांक २७ जुलै, २०१५ / श्रावण ५, १९३७ ( शके )**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **महसूल, पुनर्वसन व मदत कार्य, भूकंप पुनर्वसन, अल्पसंख्यांक विकास आणि औकाफ, कृषी आणि फलोत्पादन, पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय, राज्य उत्पादन शुल्क मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(२)** | **परिवहन मंत्री** | |
| **(३)** | **उर्जा, नवीन व नवीकरणीय उर्जा मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३९**

---

**मालेगांव (जि.वाशिम) येथे कृषि विभागाकडून बी-बियाणे वाटपात झालेला गैरव्यवहार**

**(१) * २७०५५ श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मालेगांव (जि.वाशिम) येथील कृषी विभागाच्या वतीने शेतकऱ्यांना पेरणीसाठी देण्यात येणाऱ्या बी-बियाणे वाटपात प्रचंड गैरप्रकार झाल्याचे माहे जून, २०१५ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, बियाणे वाटपाच्या वेळेस कृषी विभागाचा एकही जबाबदार अधिकारी हजर नसल्याचे निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, बियाणे वाटप एका गोदामपालाच्या मर्जीने होत असल्यामुळे शेतकरी संतप्त झाल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, बी बियाणे वाटपातील गैरप्रकारास जबाबदार असणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) हे खरे नाही, पिक प्रात्यक्षिकांसाठी निवडण्यात आलेल्या गावातील संबंधित लाभार्थ्यांना रीतसर बियाणे वाटप करण्यात आले आहे.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जळगांव जिल्ह्यातील गिरणेच्या चांदसर पात्रातून ठेकेदार**
**अवैध वाळू वाहतूक करीत असल्याबाबत**

**(२) * २०००३ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जळगांव जिल्ह्यातील गिरणेच्या चांदसर पात्रातून ठेकेदार चांदसर ते पाळधी मार्गावर भरदिवसा वाळू वाहतूक करीत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने अवैध वाळू वाहतूक करणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) जळगाव जिल्ह्यातील धरणगांव तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत, ही वस्तुस्थिती आहे.
(२) धरणगांव तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी भरारी पथक गठीत करण्यात आले असुन, सदर पथकाने केलेल्या तपासणीत एप्रिल २०१५ ते जून २०१५ या कालावधीत २७ वाहनधारकांकडून रु. ४,३६,०८४/- एवढा दंड वसूल करण्यात आला असून २ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मार्केड (ता.चिपळूण) येथे चुकीच्या पध्दतीने वीजवाहिनी जोडल्याने ग्राहकांच्या घरातील इलेक्ट्रीक वस्तु जळाल्याबाबत**

**(३) * २६५१३ श्री.भरतशेठ गोगावले (महाड) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिपळूण तालुक्यातील मार्केड येथील वीज खांब बदलल्यानंतर चुकीच्या पध्दतीने वीजवाहिनी जोडल्याने ओव्हर सप्लाय झाल्यामुळे अनेक घरातील फ्रिज, टी.व्ही, सेटॉप बॉक्स, वॉशिंग मशीन, ट्युबलाईट अशी अनेक महागडी इलेक्ट्रॉनिक्स उपकरणे जळून खाक होऊन लाखोचे नुकसान झाल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चाकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने यास जबाबदार असणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्याबाबत व ग्राहकांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासन स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) होय, हे अंशत: खरे आहे. अंदाजे रु.७४००/- चे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) होय.

(३) चौकशीच्या अनुषंगाने ठेकेदार जबाबदार असल्याने ठेकेदारामार्फत संबंधितांना नुकसान भरपाई देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

----------------

**भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील विटभट्टी व्यवसायिकांचे अवकाळी पाऊस, गारपीटीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याबाबत**

**(४) * २०७१५ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भिवंडी (जि.ठाणे) तालुक्यातील विटभट्टी व्यावसायिकांचे व मजूरांचे दिनांक १३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या दरम्यान झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीटीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून अद्यापही विटभट्टी व्यावसायिकांना नुकसान भरपाई देण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती भिवंडी तालुक्यातील नुकसानग्रस्त विटभट्ट्यांचे पंचनामे तात्काळ करुन विटभट्टी व्यावसायिकांना नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) ठाणे जिल्ह्यातील भिवंडी तालुक्यात दिनांक १३ डिसेंबर, २०१४ रोजी वा त्या दरम्यान ८.०० मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. सदर कालावधीत झालेल्या अवकाळी पाऊस, गारपीटीमुळे विटभट्टी व्यावसायिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे आढळून आलेले नाही. त्यामुळे विटभट्टी व्यावसायिकांना नुकसान भरपाई देण्याचा प्रश्न उद्भवला नाही.

-----------------

**चांदूरबाजार (जि.अमरावती), शेगाव (जि.बुलढाणा) व अकोला (जि.अकोला) तालुक्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूक होत असल्याबाबत**

**(५) * १६९८४ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), श्री.गोवर्धन शर्मा (अकोला पश्चिम), डॉ.संजय कुटे (जळगाव जामोद), डॉ.संजय रायमुलकर (मेहकर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यात वाळूची मोठया प्रामाणात खुले आम वाहतूक करण्यात येत असूनही महसूल विभागाचे याकडे दुर्लक्ष होत असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच शेगाव (जि.बुलढाणा) तालुक्यात विनापरवाना रेतीची चोरट्या मार्गाने अवैध वाहतूक करतांना ३ वाहनांना महसूल विभागाने माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान पकडण्यात आले, हे खरे आहे काय,

(३) तसेच अकोला (जि.अकोला) तालुक्यातील कट्यार व एकलारा येथील वाळूघाटामधून दररोज शेकडो ब्रास वाळूचे अवैधरित्या उत्खनन केले जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करुन अवैध होत असलेली वाळूची तस्करी व उत्खनन रोखण्याबाबत तसेच याकडे महसूल विभागातील दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) (अ) चांदूरबाजार (जि.अमरावती) तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी पथके तयार करण्यात आली असून, सदर पथकामार्फत गौण खनिजाच्या अवैध उत्खनन/वाहतूकीवर नियंत्रण ठेवण्यात येते. या पथकांद्वारे माहे एप्रिल, २०१५ मध्ये ८ प्रकरणांत दंडात्मक कारवाई करण्यात आली आहे.

(ब) शेगाव तालुक्यात (जि.बुलढाणा) माहे जून, २०१५ च्या सुमारास गौण खनिजाची अवैध वाहतूक करणाऱ्या २१ वाहनधारकांकडून रु.२,३०,१००/-इतका दंड वसूल करण्यात आला आहे.

(क) अकोला तालुक्यातील (जि.अकोला) कट्यार व एकलारा येथील वाळूघाटामधून दररोज शेकडो ब्रास वाळूचे अवैध उत्खनन केले जात असल्याचे निदर्शनास आले नाही. मात्र अकोला तालुक्यातील कट्यार व एकलारा रेतीघाटांचे मार्गावरुन अवैध वाहतुकीबाबत ८ वाहनांवर दंडात्मक कारवाई करुन रु.८२,८००/- एवढा दंड वसूल केला आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सावनेर (जि.नागपूर) तालुक्यासह आजुबाजूच्या परिसरात चवळीच्या निकृष्ट दर्जाच्या बियाणांचा पुरवठा होत असल्याबाबत

**(६) * २११५४ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सावनेर (जि.नागपूर) तालुक्यासह आजुबाजूच्या परिसरात खरीप हंगाम २०१४ मध्ये चवळीचे निकृष्ट दर्जाचे बियाणे नामधारी सिड्स कंपनीद्वारे नागपूर येथील लोहिया बिज भंडार, एस.चौधरी ॲण्ड सन्स, ॲग्रोटेक नागपूर, शक्ती अग्रोटेक, अमर अग्रोटेक, श्याम अग्रोटेक या दुकानातून पुरवठा करण्यात आलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अधिकृत विक्रेत्यांची कृषी आयुक्तालय पुणे यांच्याकडे तक्रार केली असता तालुका कृषी अधिकारी श्री.लांडे यांनी नामधारी सिड्स कंपनीचे संचालक व बियाणे विक्रेता यांच्याशी संगनमत करुन बनावट अहवाल तयार केला, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तालुका कृषी अधिकारी श्री.लांडे व इतर आठ संचालक मंडळाच्या विरोधात सावनेर पोलीस ठाण्यात तक्रार केली आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीअंती तालुका कृषी अधिकारी व निकृष्ट दर्जाचे बियाणे विक्री करणारे कंपनी संचालक व विक्रेत्यांविरुध्द शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सावनेर येथील शेतकऱ्यांनी तशा प्रकारची दिलेली तक्रार दि.०८/०८/२०१४ रोजी कृषि विभागाच्या तालुका तक्रार निवारण समितीला प्राप्त झालेली होती.

(२) हे खरे नाही.

(३) तक्रारकर्त्यां शेतक-यांनी सावनेर पोलीस ठाण्यात श्री. लांडे, मंडळ कृषि अधिकारी सावनेर व इतर यांच्या विरुध्द परस्पर तक्रार केलेली आहे, हे खरे आहे.

(४) चौकशी चालू आहे.

(५) बियाणे अधिनियम, बियाणे नियम व बियाणे नियंत्रण आदेशातील तरतूदींचे उल्लंघन केल्या प्रकरणी किरकोळ बियाणे विक्री करणाऱ्या २ विक्रेत्यांचे परवाने निलंबीत करण्यात आलेले असून ४ बियाणे विक्रेत्यांना सक्त ताकीद देण्यात आलेली आहे.

(६) प्रश्न उद्‍भवत नाही.

-----------------

## चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील शहर व ग्रामीण भागात असलेल्या भोगवटदार वर्ग-२ च्या जमिनी वर्ग-१ मध्ये घोषीत केल्याबाबत

**(७) * २६२४४ डॉ.सुनिल देशमुख (अमरावती) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा तालुक्यातील शहर व ग्रामिण भागात असलेल्या भोगवटदार वर्ग-२ च्या जमिनी वर्ग-१ मध्ये घोषित करुन शहरालगत अकृषक न करताच प्लॉटची खरेदी-विक्री सुरु असून यात काही शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणांची चौकशी करण्यासाठी समिती गठीत करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले, त्यानुषंगाने दोषी असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) या आशयाची तक्रार लोकप्रतिनिधींकडून करण्यात आली होती. सदर तक्रार प्रकरणात सविस्तर चौकशी करण्याकरीत त्रिसदस्यीय चौकशी समिती विभागीय आयुक्त, अमरावतीकडून नेमण्यात आली होती.

सदर चौकशीत प्रश्नाधीन जमिनी वनग्रामामध्ये येत असल्यामुळे, भोगवटदार वर्ग-२ असून भोगवटदार वर्ग-१ करता येत नसल्याचे आढळून आले. त्यामुळे सर्व प्रकरणांचे पुनर्विलोकन करुन अशा जमिनी पुन्हा भोगवटदार वर्ग-२ मध्ये रुपांतरीत करण्याबाबत आदेश उप विभागीय अधिकारी यांनी पारीत केले असून त्यानुसार सदर जमिनी भोगवटदार वर्ग-१ मधून वर्ग-२ मध्ये रुपांतरीत करण्याबाबत फेरफार नोंदी घेण्यात आलेल्या आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खानापूर (ता.कारंजा, जि.वाशिम) येथील शेतकऱ्याला महावितरण कंपनीकडून नुकसान भरपाई मिळणेबाबत**

**(८) * २६५५८ श्री.राजेंद्र पाटणी (कारंजा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) खानापूर (ता.कारंजा, जि.वाशिम) येथील श्री.बाळु कडू पाटील या शेतकऱ्याचे विजेच्या तारामुळे दोन बैल जळून खाक झाल्याची घटना दिनांक २० मार्च, २०१३ रोजी वा त्यासुमारास घडली असून सदर शेतकऱ्याला महावितरण कंपनीकडून मदत मिळण्याबाबत निवेदनाद्वारे मागणी करण्यात आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने नुकसान भरपाई देण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे. खानापूर, ता.कारंजा, जि.वाशिम येथील श्री.बाळू कडू पाटील यांच्या ऐवजी श्री.जर्नादन विठ्ठलराव कडू यांच्या तीन बैलांचा दिनांक ३.१०.२०१३ रोजी प्राणांतिक अपघात झाल्याबाबत महावितरण कंपनीकडून मदत मिळण्याबाबत मागणी करण्यात आलेली आहे.

(२) होय.

(३) सदर अपघातात मृत पावलेल्या बैलांच्या मालकास द्यावयाची नुकसान भरपाई अंतिम टप्प्यात असून ती त्वरीत देण्यात येईल.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरामध्ये वादळी वारा व पावसामुळे विद्युत तारा तुटून विद्यार्थीनीचा अपघाती झालेला मृत्यु**

**(९) * २६३१४ श्री.सदानंद चव्हाण (चिपळूण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) चिपळूण (जि.रत्नागिरी) शहरामध्ये दिनांक २२ मार्च, २०१५ रोजी वा त्या सुमारास झालेल्या वादळी वारा व पावसामुळे विद्युत तारा तुटून पडलेल्या दुर्घटनेत शहरातील खेंड मापारी मोहल्ला येथील कु.शाहीन उंडरे नामक विद्यार्थीनीचा अपघाती मृत्यु झाला, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर ठिकाणी महावितरण कंपनीकडून योग्य ती खबरदारी, गार्डींग व दुरुस्तीचे काम वेळेत न केल्यामुळे अशा प्रकारची दुर्घटना घडली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने संबंधित दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली,
(४) असल्यास, संबंधित कुटूंबियांना मदत देण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,
(५) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे. सदरहू अपघात दिनांक २६.३.२०१५ रोजी घडलेला आहे.
(२) हे खरे आहे.
(३) होय, विद्युत निरीक्षक, रत्नागिरी यांचेमार्फत महावितरण कंपनी, उप विभाग चिपळूण, जि.रत्नागिरी यांना दिनांक ८.४.२०१५ च्या पत्रान्वये कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली असून अपघातग्रस्त कुटूंबास नियमानुसार नुकसान भरपाई देण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
(४) अपघातग्रस्तांच्या वारसांना तातडीची नुकसान भरपाई म्हणून रु. २०,०००/- व उर्वरित नुकसान भरपाई म्हणून रु.१,८०,०००/- अशी एकूण रु. २,००,०००/- धनादेशान्वये दिनांक २४.६.२०१५ रोजी देण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील शेतकऱ्यांना दुष्काळी अनुदान न मिळाल्याबाबत**

**(१०) * २०१६०  श्री.बसवराज पाटील (औसा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रेणापूर (जि.लातूर) तालुक्यातील कोष्टगाव, सुकणी, रामवाडी, लहानेवाडी आदी गावांतील शेतकऱ्यांना २०१४-२०१५ च्या कालावधीमध्ये दुष्काळी अनुदान न मिळाल्यामुळे सदरहू शेतकऱ्यांनी जिल्हाधिकारी, लातूर यांना लेखी निवेदन सादर केलेले असतानाही त्याची योग्य ती दखल न घेतल्यामुळे दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजीच्या दरम्यान तहसिलदार, रेणापूर यांच्या कार्यालयासमोर ८० पेक्षा अधिक शेतकऱ्यांनी बेमुदत उपोषण सुरु केले असून, सदरहू उपोषण करणाऱ्या अनेकांची प्रकृती खालावल्याने ५ जणांना लातूर तर १० जणांना रेणापूर येथील शासकीय रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन, २०१४-२०१५ च्या दुष्काळी अनुदान वाटपात झालेल्या अनियमितता व शेतकऱ्यांवर झालेल्या अन्यायाप्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने अनुदान लाटणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

(२) होय. दुष्काळी अनुदानातील वाटपाबाबत झालेल्या अन्याय प्रकरणी नायब तहसिलदार-महसूल व मंडळ अधिकारी कारेपूर यांच्यामार्फत दि. ५.५.२०१५ रोजी चौकशी करण्यात आली. सदर चौकशी अहवालानुसार दुष्काळ अनुदान वाटपात कसल्याही प्रकारचा गैरव्यवहार व अपहार व अनियमितता झाल्याचे दिसून आलेला नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**नांदगांव पेठ (जि.अमरावती) येथे म.औ.वि.मं. करिता शासनाने शेतकऱ्यांच्या जमिनी कमी भावाने अधिग्रहीत केल्याबाबत**

**(११) * १६८४० ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा), प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नांदगांव पेठ (जि.अमरावती) येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकरिता शासनाने एकूण १२ झोन मधील (बारा गावांतील) शेतकऱ्यांच्या एकूण ७००० एकर जमिनी सन १९९४-९५ मध्ये कमी भावाने अधिग्रहीत केल्या असून शेतकऱ्यांना अद्यापही जमिनीचा संपूर्ण मोबदला दिलेला नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त परिसरातील ८० टक्के जमीन ही अविकसीत असून शेतकऱ्यांच्याच ताब्यात आहे, नवीन भुसंपादन कायद्याचे कलम २४(२) अन्वये मागील २० वर्षापासून अधिग्रहीत केलेल्या जमिनीचा उपयोग न केल्याने ती जमीन शेतकऱ्यांना परत करणे आवश्यक आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने १२ झोन मधील अधिग्रहीत केलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे नाही.

सदर प्रकरणामध्ये दिनांक २०.३.१९९७ ला भूसंपादनाबाबत अंतिम निवाडा पारित करुन कार्यावाही पूर्ण करण्यात आलेली आहे. सदर बाबतीत भूधारकांना मोबदल्याची रक्कम वाटप करण्यात आलेली आहे.

(२) हे खरे नाही.

संपादित जमिनीचा संपुर्ण ताबा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांच्याकडे देण्यात आलेला आहे.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## घोडबंदर (जि.ठाणे) परिसरातील आर.एन.ए. कार्पोरेशनच्या जमिन मोजनीमध्ये झालेला गैरव्यवहार

**(१२) * १७८७४ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) घोडबंदर (जि.ठाणे) परिसरातील आर.एन.ए. कार्पोरेशनची सहा प्रकरणी मोजनीमध्ये भूमिअभिलेख कार्यालयामध्ये मोठ्या प्रमाणावर गैरव्यवहार केलेला असून मूळ नकाशेच नष्ट केले असल्याचे एप्रिल, २०१५ च्या शेवटच्या आठवड्यात निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास चौकशीच्या अनुषंगाने गैरव्यवहार करणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) मे. आर.एन.ए. कार्पोरेशन ते मौजे घोडबंदर येथील वेगवेगळ्या सर्व्हे नंबरच्या मोजणीसाठी ६ प्रकरणे उपअधिक्षक भूमी अभिलेख, ठाणे कार्यालयात दाखल केली होती. सदर प्रकरणांमध्ये दि.२०.९.२०१३ ते ३०.९.२०१३ या कालावधीमध्ये मोजणी करुन दिनांक २३.१०.२०१३ रोजी मोजणी नकाशाच्या "क" प्रती देवून प्रकरणे निकाली करण्यात आली. त्यानंतर मो.र.न. ६९३१/२०१३ च्या मोजणी नकाशावर असणारी स्वाक्षरी खोटी असल्याचे निदर्शनास आल्यानंतर तपासणी केली असता मो.र.न. ६९३१, ६९३२, ६९३५, ६९३९, ६९४०, ६९४१ या सर्व नकाशांवर भूकरमापक, छाननी लिपिक, मुख्यालय सहाय्यक यांच्या बनावट व खोट्या स्वाक्षऱ्या असल्याचे आढळून आले. केवळ श्री.देवेंद्र मांजरे या भूकरमापकाची स्वाक्षरी खरी व तंतोतंत जुळणारी असल्याचे आढळून आले. त्यानुषंगाने उपसंचालक भूमि अभिलेख, कोकण प्रदेश, मुंबई यांच्याकडून सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली. चौकशीमध्ये श्री.देवेंद्र मांजरे भूकरमापक हे प्राथमिकदृष्ट्या दोषी आढळल्याने त्यांना दि.०१.०४.२०१५ पासून निलंबित करणेत आले. तसेच त्यांचेविरुध्द म.ना.से. (शिस्त व अपील) नियम, १९७९ मधील ८ अन्वये विभागीय चौकशी सुरु करणेत आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## रत्नागिरी जिल्ह्यात वादळी अवकाळी पावसामुळे घरांचे व गोठ्यांचे नुकसान झाल्याबाबत

**(१३) * १८४४० श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यात माहे फेब्रुवारी-मार्च, २०१५ मध्ये झालेल्या वादळी अवकाळी पावसामुळे ८५८ घरे व गोठ्यांचे असे सुमारे ५६ लाखांचे नुकसान झाले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नुकसानीचा अहवाल जिल्हा प्रशासनाकडून राज्य शासनाकडे पाठविण्यात आला होता हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती सदर नुकसान भरपाई देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३) व (४) रत्नागिरी जिल्ह्यात दिनांक २८ फेब्रुवारी ते मार्च, २०१५ मध्ये झालेल्या अवकाळी पावसामुळे ८५८ घरांचे व ४९ गोठ्यांचे अंशत: नुकसान झाले असून सुमारे रुपये ४८.१० लाखाचे नुकसान झाले आहे. आपदग्रस्तांना मदत वाटपाची कार्यवाही करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पनवेल (जि.रायगड) येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयात दलाल सक्रीय असल्याबाबत

**(१४) * २३६१६ श्री.प्रशांत ठाकूर (पनवेल), श्री.समीर कुणावार (हिंगणघाट) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल (ता.पनवेल, जि.रायगड) प्रादेशिक परिवहन कार्यालयात परिवहन प्रशासनाने दलालांना कार्यालय व परिसरात मज्जाव तसेच दलाल मुक्तीचा आदेश देऊनही पुन्हा पनवेल प्रादेशिक परिवहन कार्यालयात दलाल सक्रीय झाले असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पनवेल उपप्रादेशिक परिवहन कार्यालय परिसरात १५० प्रादेशिक परिवहन दलाल जास्त पैशाची मागणी करुन वाहनधारकांची लुबाडणूक करीत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीअंती आवश्यक ती कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४)  नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) व (२) नाही.
(३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मालाडच्या मालवणी येथील दारुच्या गुत्त्यातून गावठी दारु प्राशन केल्याने ८० पेक्षा जास्त व्यक्तींचा मृत्यू झाल्याबाबत**

**(१५) * २६६८५ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड), श्री.शिरीषदादा चौधरी (अमळनेर), श्री.छगन भुजबळ (येवला), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.सदा सरवणकर (माहिम), श्री.अजय चौधरी (शिवडी), श्री.प्रकाश फातर्पेकर (चेंबूर), डॉ.अनिल बोंडे (मोर्शी), श्री.गणपत गायकवाड (कल्याण पूर्व), श्री.सुधाकर भालेराव (उदगीर), श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी), श्री.विलास तरे (बोईसर), श्री.भरतशेठ गोगावले (महाड), श्री.उल्हास पाटील (शिरोळ), श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मालाडच्या मालवणी येथील दारुच्या गुत्त्यातून गावठी दारु प्राशन केल्यानंतर काही मजुरांना आणि रिक्षाचालकांना मळमळ आणि उलट्यांचा त्रास सुरु झाल्याने कांदिवली येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर रुग्णालय (शताब्दी रुग्णालय) आणि इतर खाजगी रुग्णालयात दाखल केल्यानंतर आजवर ८० पेक्षा जास्त रुग्ण दगावले असल्याचे माहे जून २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, याप्रकरणाचा तपास करतांना पीडितांच्या कुटुंबियांना पोलिसांना माहिती न देण्यासाठी धमकावले जात आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीअंती गावठी दारु विकणा-यांना तसेच तपास करतांना पीडितांच्या कुटुंबियांना पोलिसांना माहिती न देण्यासाठी धमकावणा-या व्यक्तींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

तपासाच्या अनुषंगाने पिडीतांच्या कुटुंबियांकडे चौकशी करुन जाबजबाब नोंद करण्यात आले आहेत. सदर प्रकरणी कोणत्याही पिडीत व्यक्ती किंवा नातेवाईकांनी त्यांना धमकाविण्यात आल्याबाबत तक्रार केलेली नाही.

(३) व (४) सदर प्रकरणी दिनांक १८.०६.२०१५ रोजी मालवणी पोलीस ठाणे गुरक्र. ३६१/१५, कलम ३०४, ३२८, ११४ भादंविसं सह कलम ६५ मुंबई दारुबंदी कायदा अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास गुन्हे शाखा, मुंबई यांचेमार्फत डीसीबी, सीआयडी, गुनोंक्र. ७१/२०१५, कलम ३०४, ३२८, ११४, २०१, १०९, १२० (ब), भादंविसं कलम ६५ मुंबई दारुबंदी कायदा सह पॉयझन ॲक्ट १९१९ सह महाराष्ट्र पॉयझन (ॲमेंडमेंट) रुल्स २०११ चे कलम १८ (ब) प्रमाणे करण्यात येत आहे. नमुद गुन्ह्यात आतापर्यंत ९ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे. सदर गुन्ह्याच्या तपासात आणखी काही आरोपींची नावे निष्पन्न झाली असून सदर सर्व पाहिजे आरोपींचा शोध सुरु आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सफाळे (जि.पालघर) येथील बेटाच्या संरक्षण बंधाऱ्याजवळ अनधिकृतपणे उत्खनन होत असल्याबाबत

**(१६) * २७२३५ श्री.विलास तरे (बोईसर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सफाळे (जि.पालघर) जवळील वाढीव बेटाच्या संरक्षण बंधा-याजवळ चांगल्या प्रकारची रेती मिळत असल्याने या रेतीचा अनधिकृतपणे उपसा केल्याने वाढीव बेटाचे संरक्षण बंधारे फुटुन भरतीच्या उधाणाचे पाणी गावात शिरण्यात सुरुवात झाली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत ग्रामस्थांनी तहसिलदार, पालघर यांची भेट घेऊन या अनधिकृत रेती उत्खनन करणा-या विरुध्द तात्काळ कारवाई करण्यात यावी अशी मागणी केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणी महसूल विभागातर्फे चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषांगाने रेती उत्खनन करणाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) सफाळे जवळील (जि.पालघर) वाढीव बेट संरक्षण बंधारा हा वैतरणा या मुख्य खाडीस लागून असल्यामुळे दरवर्षीच्या पावसामुळे व भरतीच्या उधाणामुळे बंधाऱ्यास बऱ्याच ठिकाणी खांडी पडून काही ठिकाणी बांधाची मोठ्या प्रमाणात धूप झालेली असल्यामुळे समुद्राचे उधाणाचे पाणी योजनेच्या पुन:प्रापित क्षेत्रात व गावांमध्ये शिरुन भातशेतीचे नुकसान होते, ही वस्तुस्थिती आहे.
(२), (३) व (४) ग्रामस्थांनी अवैध रेती उत्खननाबाबत केलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने, दि.९.४.२०१५ व दि.१५.६.२०१५ रोजी तहसिलदार पालघर, मंडळ अधिकारी सफाळा, सफाळा मंडळातील सर्व तलाठी, पोलीस स्टेशन केळवा येथील कर्मचारी व गावचे पंच यांनी तक्रारदारासह जागेवर जावून पाहणी केली असता, मौजे वाढीव गावातील बंधाऱ्याजवळ रेती उत्खनन होत असल्याचे आढळून आले नाही.
(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**खोपोली (जि.रायगड) शहरातून काढण्यात येत असलेल्या बाहयवळण रस्त्यासाठी पातळगंगा नदीच्या पात्रातच भराव केला जात असल्याबाबत**

**(१७) * २६६३१ श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर) :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) खोपोली (जि.रायगड) शहरातून काढण्यात येत असलेल्या बाहयवळण रस्त्यासाठी पातळगंगा नदीच्या पात्रातच भराव केला जात असल्याने पावसाळ्यात शिळफाटा व परिसरातील अनेक गावे जलमय होण्याची भिती निर्माण झाली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, पुराचा संभाव्य धोका लक्षात घेवून नदीच्या पात्रात केला जाणारा भराव बंद करण्याची मागणी तेथील ग्रामस्थांनी तसेच लोकप्रतिनिधी यांनी तहलिसदार, खोपोली तसेच एमएमआरडीएच्या अधिका-यांकडे वारंवार निवेदने दिली आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, याबाबत चौकशी करण्यात आली आहे काय,
(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे खरे नाही.
(३), (४) व (५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**राज्य परिवहन महामंडळ आर्थिक संकटात असल्याबाबत**

**(१८) * १९२०६ श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) राज्य परिवहन महामंडळ, इंधनाचे वाढते दर व कामगारांच्या वेतन करार तसेच शासनाकडे महामंडळाची असलेली थकबाकी रु.२०११ कोटी शासनाने महामंडळाला अद्‌याप न दिल्यामुळे आर्थिक संकटात सापडले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती महामंडळाची कोट्यवधी रुपयांची देणी महामंडळाला तातडीने देण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) राज्य परिवहन महामंडळास सन २०१४-१५ च्या अखेरीस शासनाकडून एकूण रक्कम रु. १६५५.२५ कोटी येणे असून, सन २०१५-१६ च्या अर्थसंकल्पात रु.१६१२.८२ कोटीची तरतूद अर्थसंकल्पित करण्यात आलेली आहे.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनीने शेतकऱ्यांच्या कृषी पंपाच्या विजेचे वाढीव बील आकारुन कोट्यवधी रुपये वसूल केल्याबाबत**

**(१९) * २६०७६ श्री.हरीभाऊ जावळे (रावेर) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य महावितरण कंपनीने माहे डिसेंबर २०११ ते माहे मार्च २०१२ या तीन महिन्यांच्या कालावधीत शेतक-यांनी त्यांच्या कृषिपंपाच्या वीज लोड मध्ये मागणी नसताना वाढ करुन वाढीव बिल आकारुन सुमारे ३० कोटी रुपये वसूल केल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सन २०१४ मध्ये महावितरण कंपनीने राज्यातील १६ लाखांपैकी १२ लाख कृषिपंपाचा लोड वाढविल्यामुळे शेतकऱ्यांकडून २७१ कोटी व शासनाकडून अनुदानाच्या रुपाने ६३१ कोटी असे एकूण ९०२ कोटी रुपयांचा अधिक महसूल कंपनीला प्राप्त झाल्याची तक्रार महाराष्ट्र वीज ग्राहक संघटनेने शासनाकडे केली आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त तक्रारीनुसार शासनाने कृषिपंप वीज खर्च व वाढीव लोड याची संस्थेकडून तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, तपासणीमध्ये काय आढळून आले व त्यानुसार कोणती कार्यवाही करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) हे खरे आहे.

(३) हे खरे आहे.

(४) सदर प्रकरणी सत्य शोधन समिती नियुक्त करण्यात आली असून या समितीला अहवाल सादर करण्यासाठी दिनांक ३१.१२.२०१५ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धर्माबाद (जि.नांदेड), फुलंब्री (जि.औरंगाबाद) व जालना जिल्ह्यात**
**वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक होत असल्याबाबत**

**(२०) * २३०४८ श्रीमती अमिता चव्हाण (भोकर), श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.वसंतराव चव्हाण (नायगांव), श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.राजेश टोपे (घनसावंगी), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धर्माबाद (जि.नांदेड) तालुक्यातील लिलाव न झालेल्या रेती घाटावरुन रेतीचा अहोरात्र उपसा चालू असून थेट राहेळ आटाळा ते तेलंगणा सिमेपर्यंत रेती तस्करी सुरु असून याबाबत उपविभागीय तसेच तहसील कार्यालय यांच्याकडे तक्रारी दाखल करण्यात आल्या असल्याचे माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच फुलंब्री (जि.औरंगाबाद) तालुक्यातील अनेक ठिकाणी शासनाचे नियम धाब्यावर बसवून वाळूपट्टाधारकांनी १० ट्रॅक्टरचा उपसा करण्याची परवानगी असतांना ४० ट्रॅक्टर वाळूचा उपसा केला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(३) जालना जिल्ह्यातील वाळूचे उत्खनन महसूल अधिकारी व पोलीस यांच्या संगनमताने होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने वाळू उपसा करणाऱ्यांवर व त्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) यासंदर्भात उपविभागीय अधिकारी, धर्माबाद यांच्याकडे दोन निवेदने प्राप्त झाली, हे खरे आहे.

(२) भालगांव, ता.फुलंब्री या वाळुगटाबाबतचे निवेदन दि.१८.५.२०१५ रोजी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना प्राप्त झाले आहे.

(३) जालना जिल्ह्यात वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत, ही वस्तुस्थिती आहे.

(४) व (५) (अ) उपविभागीय अधिकारी, धर्माबाद यांच्याकडे प्राप्त निवेदनांच्या अनुषंगाने नायब तहसिलदार, धर्माबाद यांच्या अधिपत्याखाली पथक गठित करण्यात आले होते. सदर पथकाने माहे एप्रिल, २०१५ ते जून २०१५ या कालावधीत रेतीचे अवैध उत्खनन/वाहतूकीच्या ७ प्रकरणांत रु.१,५८,५०२/- इतका दंड वसूल केलेला आहे.

मौ.राहेर, ता.नायगांव या रेतीगटाचा लिलाव झाला असून, सदर रेतीघाटामध्ये जेसीबी द्वारे उत्खनन होत असल्याचे निदर्शनास आल्यावरुन या रेतीघाटामधून उत्खनन बंद करण्यात आले असून, लिलावधारक यांची अनामत रक्कम व बँक गॅरंटी जप्त करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(ब) भालगांव, ता.फुलंब्री या वाळूगटाबाबत प्राप्त निवेदनाच्या अनुषंगाने केलेल्या तपासणीत, लिलावधारकाने मंजूर परिमाणापेक्षा जास्त वाळूचे उत्खनन केल्याचे आढळून आल्यावरुन, लिलावधारकाविरुध्द दंडात्मक कारवाई सुरु आहे.

(क) जालना जिल्ह्यात एप्रिल, २०१५ ते जून, २०१५ या कालावधीत अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ८७ प्रकरणांत रु.२३,१०,८०७/- इतकी रक्कम वसूल करण्यात आली असून ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

(६) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पाटण (जि.सातारा) तालुक्यातील तारळी धरण प्रकल्पातील प्रकल्पग्रस्तांना वहीवाटीकरीता दिलेल्या रस्त्यात घर बांधून केलेल्या अतिक्रमणाबाबत

**(२१) * २१८९७ श्री.शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण (जि.सातारा) तालुक्यातील तारळी धरण प्रकल्पातील सावरघर पुनर्वसीत गावठाणाकरीता गट नं.३५ मध्ये नकाशाप्रमाणे गावठाण वसविताना प्रकल्पग्रस्तांना रहदारीकरीता रस्ता देण्यात आला होता, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या गट नं.३५ मध्ये श्री.चंद्रकांत, विठ्ठल व राजेंद्र हरीबा सपकाळ या तीन भावांनी घराचे बांधकाम करून अतिक्रमण केले असून प्रकल्पग्रस्तांना येण्या जाण्याचा मार्गच बंद केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, गावठाण वसविताना गट नं.३५ मध्ये प्रकल्पग्रस्तांना रहदारीकरीता अस्तित्वात असलेल्या रस्त्यावर केलेल्या अतिक्रमणा विरोधात गावठाणातील सर्व प्रकल्पग्रस्तांनी विरोध केल्यामुळे त्यांच्यावर खोटे गुन्हे दाखल केले आहेत, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर अतिक्रमणाबाबत उपविभागीय अधिकारी महसूल, कराड यांच्याकडे संबंधित प्रकल्पग्रस्तांनी तक्रार केल्यानंतर उपविभागीय अधिकारी यांनी राजकीय दबावाखाली येवून सदरचे गट नं.३५ मध्ये नकाशाप्रमाणे पूर्वी रस्ता नव्हता असे दाखविण्याकरीता नकाशे बदलण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(६) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अतिक्रमण करुन केलेले बांधकाम पाडण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, अंशत: खरे आहे.

(२) हे खरे नाही.

सन १९९९ चे मुळ रेखांकनाप्रमाणे चंद्रकांत, विठ्ठल व राजेंद्र हरीबा सपकाळ यांना भुखंड क्र.११४ ते ११९ चे वाटप करण्यात आलेले आहे.

(३) हे खरे नाही,

बदललेल्या अभिन्यासानुसार गावठाणातील रस्ता दर्शविलेल्या मुळ भुखंड क्र. ११६ मधुन ये-जा करण्यावरुन प्रकल्पग्रस्तांमध्ये वाद उद्‌भवला होता व त्याबाबत दिनांक ०३/०३/२०१५ रोजी गुन्हा दाखल झालेला आहे.

(४) हे खरे नाही.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.
(६) प्रश्न उद्‌भवत नाही.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाची कागदी तिकीटे हरविल्याबाबत**

**(२२) * २६८७९ श्री.प्रतापराव चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाचे एक कोटी वीस लाख रुपये किंमतीची कागदी तिकीटे हरविली असल्याचे माहे जून, २०१५ च्या पहिल्या आठवड्यात वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, या प्रकरणाची चौकशी केली आहे काय,
(३) असल्यास, चौकशीअंती दोषी असणाऱ्या संबंधितांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे नाही.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**वैजापूर (जि.औरंगाबाद) येथील दुय्यम निंबधक व जिल्हा निबंधक, कार्यालयात नियमबाहय गुंठेवारी प्लॉट विक्रीचे व्यवहार होत असल्याबाबत**

**(२३) * १८०६९ श्री.अतुल सावे (औरंगाबाद पूर्व) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वैजापूर (जि.औरंगाबाद) येथील दुय्यम निंबधक, जिल्हा निबंधक, कार्यालयाच्या अधिकारी व कर्मचारी यांनी गुंठेवारी खरेदी-विक्री शासनाने बंद केलेली असतांना देखील विंधन विहीरींच्या नावाखाली सर्रासपणे दलालांच्या मध्यस्थीने शासनाचे सर्व नियमांचे उल्लंघन करुन गुंठेवारी प्लॉट विक्रीचे व्यवहार करीत असल्याचे प्रकार माहे एप्रिल, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे काय,

(२) असल्यास, वैजापूर येथील दुय्यम निबंधक कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी तसेच दलाल यांनी बनावट प्रमाणपत्राचा वापर करुन जमीन सिंचनाखाली येत नसतानाही खरेदीविक्रीच्या व्यवहारातून मुद्रांक शुल्कात गैरव्यवहार केल्याचे प्रकरणही यापूर्वी निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले तसेच दोषी असणाऱ्या संबधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे?
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक, औरंगाबाद यांनी संबंधित कार्यालयाची तपासणी पथकाद्वारे तपासणी केली असता ११६ दस्तांमध्ये शेतजमीनीचे प्रमाणभूत क्षेत्रापेक्षा कमी क्षेत्राचे तुकडे पाडून विक्री केल्याचे निदर्शनास आले आहे.
(२) काही पक्षकारांनी दस्तऐवजामध्ये सिंचनाबाबत बोगस प्रमाणपत्र सादर केल्याचे तपासणीअंती निदर्शनास आले आहे.
(३) १. शेतजमिनीचे तुकडे पाडून विक्री होत असलेली खरेदीखते नोंदविणाऱ्या दुय्यम निबंधकाविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्यात येत आहे.
२. बोगस प्रमाणपत्रे जोडून कमी मुद्रांकावर दस्त नोंदणी करुन घेणाऱ्या पक्षकारांविरुध्द पोलीस स्टेशन मध्ये फिर्याद दाखल करण्यात आली आहे.
३. चुकविलेल्या मुद्रांक शुल्क व नोंदणी फी वसुलीसाठी महाराष्ट्र मुद्रांक अधिनियमानुसार वसुलीची कार्यवाही करण्यात येत आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वडगांव कोल्हाटी (जि.औरंगाबाद) येथील पाझर तलावातून व गोदापात्रातून (जि.नांदेड) अवैधरित्या मुरुम व मातीचे उत्खनन होत असल्याबाबत**

**(२४) * २६४८१ श्री.संदीपानराव भुमरे (पैठण), श्री.हेमंत पाटील (नांदेड दक्षिण), श्री.सुभाष साबने (देगलूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वडगाव कोल्हाटी (ता.जि.औरंगाबाद) येथील पाझर तलावातून मोठ्या प्रमाणात अवैधरित्या मुरुम मातीचे उत्खनन सुरु असल्याने पाझर तलावाचे अस्तित्व धोक्यात आल्याचे माहे एप्रिल, २०१५ च्या सुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) तसेच गोदापात्रातून (जि.नांदेड) दिवसरात्र मातीचे अवैध उत्खनन सुरु असल्याची तक्रार स्थानिकांनी जिल्हाधिकाऱ्याकडे माहे जून, २०१५ च्या सुमारास करुनही कोणतीच कारवाई करण्यात आली नाही, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, प्रश्न भाग १ व २ बाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने संबंधितांविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) प्रश्नाधीन पाझर तलावाचे अस्तित्व मुरुम व मातीच्या अवैध उत्खननामुळे धोक्यात आल्याची तक्रार प्राप्त झालेली नाही.

(२) गोदापात्रातून (जि.नांदेड) मातीचे अवैध उत्खनन सुरु असल्याची तक्रार जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे प्राप्त झालेली नाही.

(३) व (४) (अ) प्रश्न भाग १ च्या अनुषंगाने जिल्हा खनिखर्म अधिकारी, औरंगाबाद यांनी मौजे वडगांव कोल्हाटी ता.जि.औरंगाबाद येथील पाझर तलावास दि.१५.७.२०१५ रोजी अचानक भेट दिली असता, सदर तलावातून मुरुमाचे उत्खनन करुन तलावाच्या भिंतीवरील रस्त्यावर टाकत असल्याचे निदर्शनास आले. त्यानुसार संबंधितांवर दंडात्मक कारवाई करुन रुपये १५,५००/- इतका दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग औरंगाबाद यांना सदर तलावातून अवैध मुरुम उत्खनन रोखणेसाठी वेळोवेळी भेटी देऊन कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

(ब) नांदेड जिल्ह्यात गौण खनिजाचे अवैध उत्खनन व वाहतूकीस आळा घालण्यासाठी जिल्हास्तरावर तसेच तालुका स्तरावर मंडळनिहाय पथके तयार करण्यात आली आहेत. सदर पथकांनी केलेल्या कार्यवाहीत नांदेड जिल्ह्यात एप्रिल, २०१५ ते जून, २०१५ या कलावधीत अवैध उत्खनन व वाहतूकीच्या ७०७ प्रकरणांमध्ये रु. ९७.५३ लाख इतका दंड वसूल करण्यात आला असून, १४ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**दाभोळ-टेमकरवाडी व खेड-तुळसी (जि.रत्नागिरी) येथील दरड कोसळून ७ व्यक्तींचा मृत्यू झाल्याबाबत**

**(२५) * २७६८९ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **पुनर्वसन व मदत कार्य मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दाभोळ-टेमकरवाडी (जि.रत्नागिरी) येथील दरड कोसळून माहे जून, २०१५ मध्ये वा त्यासुमारास ५ व्यक्तींचा मृत्यू झाला तसेच खेड-तुळसी (जि.रत्नागिरी) येथील दरड कोसळून २ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे व काही व्यक्ती जखमी झाल्या आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीअंती मृत्यू पावलेल्यांच्या नातेवाईकांना व जखमी व्यक्तींना मदत देण्याबाबत तसेच दरडी कोसळण्याची ठिकाणे शोधून त्यावर कायमस्वरुपाची उपाययोजना करण्याबाबत व तेथील लोकांचे स्थलांतर करण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) व (२) होय.

(३) व (४) आपदग्रस्तांच्या नातेवाईकांना शासनाकडून मदत देण्यात आली आहे. दरडी कोसळण्याच्या ठिकाणांचे भू-वैज्ञानिकांमार्फत सर्वेक्षण करण्यात येत आहे. स्थलांतराबाबत ६२९ कुटुंबांना नोटीसा देण्यात आल्या असून उपलब्ध शासकीय जमिनीवर पुनर्वसन करण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

**श्रीरामपूर तालुक्यातील दिघी येथे महावितरण कंपनीच्या महिला सहाय्यक अभियंत्याला झालेली मारहाण**

**(२६) * १८७३९ श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.अवधूत तटकरे (श्रीवर्धन), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) श्रीरामपूर तालुक्यातील दिघी येथे वीज चोरी पथकासह वीज चोरीचा पंचनामा करण्यासाठी गेलेल्या महावितरण कंपनीच्या महिला सहाय्यक अभियंत्याला लाथाबुक्यांनी मारहाण करून सरकारी कामात व्यत्यय आणल्याची घटना दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्या अनुषंगाने माराहाण करणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशनला सदरबाबत गुन्हा नोंदविण्यात आला असून त्याबाबत पोलीस विभागामार्फत पुढील चौकशी चालू आहे.

(३) सरकारी कामात अडथळा आणणा-या आरोपींवर श्रीरामपूर शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा रजिस्टर नं.११२/१५, ३५३, ३३२, ५०४, ५०६, ३४ अन्वये दिनांक २८.४.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**पुणे जिल्हयातील औंध विभागातील महावितरणाच्या मनमानी कारभाराबाबत**

**(२७) * २७०४४ श्री.जयकुमार गोरे (माण) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे जिल्हयातील औंध विभागातील महावितरणाच्या मनमानी कारभारामुळे १३ गावांमध्ये सुमारे ४ हजार वीज ग्राहकांना उशिराने वीज बिल अदा केल्याने दंडात्मक रक्कमेचा हजारो रुपयांचा आर्थिक भुर्दंड सहन करावा लागला असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, वीज बिले उशिरा वाटप करणाऱ्या ठेकेदारावर तसेच ग्राहकांना नाहक भरावी लागलेली दंडाची रक्कम त्यांना परत मिळण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे आहे.

(२) उशिराने वीज बिले वाटप केल्याबद्दल संबंधित ठेकेदारावर रक्कम रु.२५००/- ची दंडात्मक कार्यवाही केलेली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**धुळे (जि.धुळे) तालुक्यातील अनेक गावपातळीवरील आणि सामुहिक नळपाणी पुरवठा योजनांकडे महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीची विज देयके थकित असल्याबाबत**

**(२८) * १६४७२ श्री.कुणाल पाटील (धुळे ग्रामीण), श्री.डी.एस.अहिरे (साक्री), ॲड.के. पाडवी (अक्कलकुवा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्रीमती निर्मला गावित (इगतपूरी) :** सन्माननीय **ऊर्जा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) धुळे (जि.धुळे) तालुक्यातील अनेक गावपातळीवरील आणि सामुहिक नळपाणी पुरवठा योजनांकडे महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनीची विज देयके थकित असल्याने विज कंपनीकडून विद्युत कनेक्शन बंद करण्यात येत आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच, धुळे तालुक्यातील संपूर्ण गावांमध्ये ५० पैसे पेक्षा कमी आणेवारी असून अवकाळी पाऊस व गारपीटमुळे उध्वस्त झालेले शेतकरी पाणी पुरवठा योजनांची पाणीपट्टी भरण्यास असमर्थ असल्याने थकबाकीत वाढ होत असल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, यापूर्वी महाराष्ट्र राज्य विद्युत कंपनी मार्फत राबविण्यात आलेली अभय योजना पुन्हा सुरु करून सदर नळपाणी पुरवठा योजनांचे थकित वीज देयकांचा भरणा सोयीस्कर रित्या भरता येईल यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, असल्यास, त्याचा तपशिल काय आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. चंद्रशेखर बावनकुळे :** (१) हे खरे नाही.

(२) हे खरे आहे. धुळे तालुक्यातील सार्वजनिक पाणी पुरवठा योजनांची मार्च २०१५ ला रुपये ७९२.५ लाख असलेल्या थकबाकीमध्ये वाढ होऊन मे, २०१५ अखेर रु. ८१८.८ लाख झालेली आहे.

(३) शासन स्तरावर निर्णय घेणे विचाराधीन आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मौजे विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील जमिनीचा बिनशेती वापर करण्यासाठी शर्त शिथिल करण्यात आल्याबाबत**

**(२९) * १७७६० श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे विरार (ता.वसई, जि.पालघर) येथील सर्व्हे नं.२१९/५ या मधील ३३७० चौ.मीटर क्षेत्रफळ असलेल्या जमिनीसाठी दिनांक २९ मे, २००६ रोजी क्र.महसूल/क-१/टे-१/एनएपी/एसआर-०३/२००६ अन्वये बिगरशेती परवानगी जिल्हाधिकारी यांनी मंजूर केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, संबंधित जमीन शासनाने जमीन धारकाला नवीन शर्ती ने दिलेली असल्याने बिगरशेती परवानगी मंजूर करण्यापूर्वी विभागीय आयुक्त कोकण विभाग यांचेकडून अर्जदाराने विक्री परवानगी आणलेली नसताना, तसेच नजराण्याची रक्कम शासनाकडे भरली नसतानाही, सदर बिगरशेती परवानगी मंजूर करण्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाचे नजराणा आणि दंडाच्या अशा एकूण ५० लाख रुपयांचे आर्थिक नुकसान झाले आहे, हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी लाखो रुपयांचा भ्रष्टाचार झाल्यामुळे सदर बिगरशेती परवानगी मंजूर करण्यात आल्याने शासनाच्या झालेल्या ५० लाख रुपयांच्या नुकसानीची वसूली करण्यासाठी सदर बिगरशेती परवानगी रद्द करुन सदर बिगरशेती परवानगी मंजूर करणा-या अधिका-यांविरुध्द कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) हे खरे आहे.

(२), (३) व (४) मौजे विरार ता.वसई जि.पालघर येथील स.नं. २१९/५ क्षेत्र ३३७०.०० चौ.मी. ही जमीन पाटील इनाम ची असून जमिनीचे सहापट कब्जेहक्काची रक्कम शासनाला भरणा केल्याने नवीन शर्तीवर पुनर्प्रदान (रिग्रांट) करण्यात आलेली आहे. शासन परिपत्रक दि. ९/७/२००२ नुसार तहसिलदार वसई यांनी दि. ५/५/२००६ रोजीचे आदेशानुसार ६४६.८९ चौ.मी. इतक्या क्षेत्रासाठी जमीन वर्ग-१ केली असून यानुसार अनुज्ञाग्राही यांनी ६४६.८९ चौ.मी. जमिनीच्या मुल्यांकनाच्या ५०% रक्कम रु.३,०७,२७२.५०/- शासनजमा केली आहे. तदनंतर जिल्हाधिकारी ठाणे यांनी दि.२९/५/२००६ च्या आदेशान्वये एकुण ३३७० चौ.मी. क्षेत्रास रहिवास व वाणिज्य प्रयोजनासाठी बिनशेती परवानगी दिलेली आहे. एकुण क्षेत्र ३३७० चौ.मी. पैकी ६४६.८९ चौ.मी. क्षेत्र वगळता उर्वरित क्षेत्राचे अनुषंगाने मुल्यांकनाच्या ५०% रक्कम बिगरशेती परवानगी देताना वसूल करणे आवश्यक होते. या प्रकरणी नियमानुसार नजराणा रक्कम वसुल करण्याबाबत तसेच याबाबत संबंधितांविरुध्द जबाबदारी निश्चित करण्याबाबत जिल्हाधिकारी पालघर यांना सुचना देण्यात आल्या आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे मैंदे (ता.भिंवडी, जि.ठाणे) गावाच्या शेतक-यांना शेती योजनांचे अमिष दाखवून जमीन खरेदीचा व्यवहार केला असल्याबाबत**

**(३०) * २४३६९ श्री.शांताराम मोरे (भिवंडी ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे मैंदे (ता.भिंवडी, जि.ठाणे) गावाच्या शेतक-यांना शेती योजनांचे अमिष दाखवून बिगर शेतकरी असलेल्या व्यापा-यांनी सन १९९४ साली तूटपुंजे पैसे देऊन ९० एकर जमीन खरेदीचा व्यवहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, व्यवहार पूर्ण झाला नसतांनाही तलाठी व मंडळ अधिका-यास हाताशी धरुन व्यापाऱ्यांनी ४५ एकर जमीन आपल्या नावावर करुन घेतली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत संबंधित शेतक-यांनी तहसिलदार भिवंडी यांच्याकडे लेखी तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, याप्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय चौकशीत काय आढळून आले त्या अनुषंगाने तलाठी व मंडळ अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२), (३), (४) व (५) मौजे मैंदे, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील शेतक-यांचे फवणूकीबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांच्याकडे निवेदन प्राप्त झाले आहे. सदर निवेदनाच्या अनुषंगाने तहसिलदार, भिवंडी मार्फत अभिलेखांची पडताळणी केली असता मौजे. मैंदे, ता.भिवंडी येथील २२-०७-०० हेक्टर शेतजमीन श्री.प्रभुदयाळ श्यामलाल अग्रवाल व इतर यांनी संबंधित जमीनमालक यांच्याकडून वेगवेगळ्या नोंदणीकृत खरेदीखताने खरेदी केली असल्याचे दिसून आले आहे. सदर व्यवहारांच्या अनुषंगाने अधिकार अभिलेखात वेगवेगळ्या फेरफार नोंदी घेण्यात आलेल्या आहेत. श्री.प्रभुदयाळ श्यामलाल अग्रवाल व इतर यांनी सदर शेतजमिनी खरेदी करताना शेतकरी असल्याचा पुरावा म्हणून मौजे घाडणे, ता.भिवंडी, जि.ठाणे येथील स.नं.५६/९ या शेतजमिनीचा गाव नमुना नं.७/१२ चा उतारा सादर केल्याचे फेरफार नोंदी वरुन दिसून येते. मौजे घाडणे येथील स.नं. ५६/९ ही शेतजमीन खरेदी करणेपूर्वी श्री.प्रभुदयाळ अग्रवाल व इतर यांनी मौजे वाघिवली, ता.मुरबाड येथील सन.नं.२०० चा गाव नमुना नं. ७/१२ चा उतारा सादर केला होता, ज्यामध्ये श्री.अग्रवाल यांचे नांव

पीक पाहणी सदरी नमूद आहे. त्यानुषंगाने प्रस्तुत प्रकरणी महाराष्ट्र कुळवहिवाट व शेतजमीन अधिनियम, १९४८ च्या कलम-६३ व ८४ क अन्वये श्री. प्रभुदयाळ अग्रवाल व इतर यांना कारणे दाखवा नोटीस देवून तहसिलदार, भिवंडी यांच्याकडून चौकशी सुरु करण्यात आलेली आहे.

-----------------

**जळगांव तालुक्यात वाळूचे अवैध उत्खनन व वाहतुक होत असल्याबाबत**

**(३१) * २००११ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगांव शहरात मोठ्या प्रमाणात अवैध वाळू उत्खनन सुरु असल्याचे नुकतेच माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अवैध वाळू वाहतूक करणा-यांवर कारवाई करु नये म्हणून, तर कधी राजकीय पक्षाचे कार्यकर्ते अवैध वाळू वाहतूक करित असल्याने त्यांच्यावर कारवाई करावी म्हणून प्रशासनाकडे अनेक तक्रारी आणि शिफारशी प्राप्त झाल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) जळगाव तालुक्यात वाळूचे अवैध उत्खनन व वाहतूक होत असल्याची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत.

(२) अशी बाब नाही.

(३) व (४) जळगाव तालुक्यात गौणखनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी भरारी पथक गठीत करण्यात आले आहे. या पथकाने केलेल्या कारवाईत एप्रिल २०१५ ते जून २०१५ या कालावधीत ५२ वाहनधारकांकडून रु. ४,४६,९००/- एवढी दंडाची रक्कम वसूल करण्यात आली असून, १ गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**सोनगाव (ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती) येथील अवैध खोदकाम बंद करण्याबाबत**

**(३२) * १६९९० प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), ॲड.यशोमती ठाकूर (सोनावणे) (तिवसा) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनगाव (ता.चांदूर रेल्वे, जि.अमरावती) येथे शेतगट ४० मधील दगड खदान व स्टोन क्रशर परवानाधारकांनी पोटहिस्सा या जमिनीमध्ये करण्यात येत असलेले अवैध खोदकाम त्वरीत थांबविण्याकरीता स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी जिल्हाधिकारी, अमरावती यांना दिनांक २१ फेब्रुवारी, २०१५ रोजी वा त्या सुमारास लेखी निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या निवेदनावर शासनाने चौकशी केली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने खोदकाम थांबविण्याबाबत कोणती कार्यवाही करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) (२) व (३) स्थानिक लोकप्रतिनिधी यांचे दि. २१.२.२०१५ रोजीचे निवेदन उपविभागीय अधिकारी, चांदूर रेल्वे यांना प्राप्त झाले. सदर निवेदनाचे अनुषंगाने स्थळनिरिक्षण व चौकशी करण्यात आली. सदर चौकशीत संबंधित स्टोन क्रशरधारक यांनी स्टोन क्रशर करीता दगडाचे खोदकाम त्यांच्याच मालकीच्या क्षेत्रात केल्याचे मात्र गिट्टी व दगडाचे वाहतूकीसाठी वहिवाट श्री. प्रकाश सराड यांचे शेतजमिनीमधून केली असल्याचे आढळून आले आहे. त्या अनुषंगाने तहसिलदार चांदूर रेल्वे यांनी दि. २०.४.२०१५ च्या पत्रान्वये स्टोन क्रशरधारक यांना श्री. प्रकाश सराड यांचे शेतामधून अथवा शेताला लागून असलेल्या जागेमधून गिट्टी व दगडाची वाहतूक करु नये, अशी ताकीद देण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**मोरभवन, नागपुर शहर येथील एस.टी. जळीतकांड**
**प्रकरणी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई करणेबाबत**

**(३३) * २३९६३ डॉ.मिलिंद माने (नागपूर उत्तर) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मोरभवन, नागपुर शहर बसस्थानकावर दिनांक २४ मे, २०१५ रोजी वा त्यासुमारास उभ्या बसने पेट घेतला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, एस.टी. जळीतप्रकरणी ७ अधिकाऱ्यांना दोषी ठरविण्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, मोरभवन, नागपुर शहर येथील एस.टी. जळीतकांड प्रकरणाबाबत शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती शासनाने दोषी ७ अधिका-यांविरुध्द काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) हे खरे आहे.

(२) या प्रकरणी ७ कर्मचारी दोषी आढळून आले आहेत.

(३) व (४) सदर घटनेच्या अनुषंगाने राज्य परिवहन महामंडळाद्वारे चौकशी करण्यात आली आहे. चौकशीमध्ये ७ कर्मचारी दोषी आढळलेले असून यामधील ४ कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. तसेच वरील घटनेच्या अनुषंगाने ७ ही कर्मचाऱ्यांवर दोषारोप बजावण्यात आले असून खातेनिहाय चौकशी सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अंबरनाथ व कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या दुसऱ्या महायुध्दाच्या काळात संपादीत केलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत मिळण्याबाबत

**(३४) * १७८७५ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अंबरनाथ व कल्याण (जि.ठाणे) तालुक्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी दुसऱ्या महायुध्दाच्या काळात संपादीत केलेल्या असून सदरच्या जमिनी पुन्हा शेतकऱ्यांना परत मिळाव्यात याकरिता १७ गावातील हजारो भूमिपुत्रांनी दिनांक २७ एप्रिल, २०१५ रोजी रास्ता रोको आंदोलन केले व तसेच दिनांक २६ मे, २०१५ रोजी ठाणे जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने दुसऱ्या महायुध्दाच्या काळात संपादीत केलेल्या जमिनी शेतकऱ्यांना परत देण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) सदर मोर्च्याच्या दिवशी स्थानिक लोकप्रतिनिधींनी व आंदोलनकर्त्यांनी जिल्हाधिकारी, ठाणे यांना निवेदन दिले होते. मात्र सदर निवेदन अद्यापही शासनास प्राप्त झालेले नाही.

प्रस्तूत प्रश्नातील विषयाबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १४.१.२०१५ व दिनांक १६.३.२०१५ रोजी पत्रे विभागास पाठविली होती. त्यानुषंगाने शासनाने अनुक्रमे दिनांक १०.४.२०१५ व दिनांक २९.५.२०१५ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक अहवाल सादर करणेबाबत जिल्हाधिकारी, ठाणे यांना कळविले आहे.

(३) व (४) जिल्हाधिकारी, ठाणे यांचा अहवाल प्राप्त करुन घेण्यासाठी पाठपुरावा करण्यात येत आहे. अहवाल प्राप्त झाल्यानंतर तपासून आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

## लातूर जिल्हयात शेतकऱ्यांना निकृष्ट दर्जाचे बियाणे आणि खते विकली जात असल्याबाबत

**(३५) * २६६८६ श्री.लक्ष्मण जगताप (चिंचवड) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) लातूर जिल्हयात शेतक-यांना निकृष्ट दर्जाचे बियाणे आणि खते विकली जात असल्याचे माहे जून, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने जप्त केलेल्या १४३ पोत्यातही असेच निकृष्ट दर्जाचे खत असल्याचे आढळून आले, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीअंती शेतक-यांची अशी फसवणूक करणा-या खते उत्पादक कारखान्यावर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) रासायनिक मिश्र खताच्या गुणवत्तेविषयी लातूर येथील एका शेतक-याने दि.१९/०६/२०१५ रोजी तक्रार केली होती, हे खरे आहे.

(२) हे खरे नाही.

(३) होय.

(४) चौकशी अंती खत उत्पादकाच्या कारखाना स्तरावर असलेल्या शिल्लक खत साठ्यास, विक्रीबंद आदेश देऊन, विश्लेषणासाठी या साठ्याचे नमुने प्रयोगशाळेत पाठविण्यात आलेले आहेत. विश्लेषण अहवाल अप्रमाणित आढळून आल्यास खत उत्पादक कारखान्यावर खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतुदीनुसार उचित कारवाई करण्यात येईल.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मुंबईतील महागड्या व आलीशान गाड्यांची नोंदणी ठाणे प्रादेशिक आणि उपप्रादेशिक कार्यालयात बनावट पत्ते व कागदपत्रांच्या अधारे होत असल्याबाबत**

**(३६) * १९२०७ श्री.अनिल कदम (निफाड), श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबईतील महागड्या व आलीशान गाड्या ठाण्यातील बनावट पत्ते व कागदपत्रे सादर करुन त्याची नोंदणी ठाणे प्रादेशिक आणि उपप्रादेशिक कार्यालयात, परिवहन अधिकारी व कर्मचा-यांच्या संगमताने करुन मुंबई महानगरपालिकेची करोड रुपयांची जकात चोरी केल्या प्रकरणी, सचिव, परिवहन विभाग यांनी परिवहन आयुक्तांना पोलीसात गुन्हा दाखल करण्याचे आदेश माहे सप्टेंबर, २०१३ च्या सुमारास दिले आहेत, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास, त्यानुसार चौकशीत दोषी आढळून आलेल्या परिवहन अधिकारी व कर्मचारी तसेच इतर संबंधित दोषी व्यक्तींवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. दिवाकर रावते :** (१) होय, परिवहन आयुक्त कार्यालयाने जुलै, २०१३ मध्ये संबंधित वाहन मालकाविरुध्द गुन्हा नोंदविण्याचे आदेश दिले आहेत.

(२), (३) व (४) संबंधित वाहन मालकांविरुध्द ठाणे नगर पोलिस, ठाणे येथे दि.०८.०८.२०१३ रोजी गुन्हा नोंदविला आहे. याप्रकरणात तपासाअंतर्गत एकूण ५१ आरोपींना अटक करण्यात आली. संबंधित वाहन मालकांकडून चुकविलेली जकात रक्कम रु.१६.२४ लक्ष वसूल करण्यात आली आहे. उर्वरीत जकात रक्कम रु.८,१६,७३२/- वसुलीची कारवाई सुरु आहे.

-----------------

**काटेवाडी (तारळे) ता.पाटण या गावाच्या हद्दीतील डोंगरात**
**सुरु असलेले बेकायदेशीर खडीक्रशर बंद करणेबाबत**

**(३७) * २१९१४ श्री.शंभुराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) काटेवाडी (तारळे) ता.पाटण या गावाच्या हद्दीत स्थानिक लोकांनी खडीक्रशर सुरु करण्याकरिता खरेदीपत्र केवळ सुमारे १० गुंठे एवढेच केले असून या खडीक्रशरचा बेकायदेशीर विस्तार सुमारे १ एकर क्षेत्रात केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरच्या खडीक्रशरमुळे प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेतंर्गत कोंजवडे ते बेदंवाडी हा रस्ता करण्यात आला असून या खडीक्रशरचे क्षेत्र रस्त्याला लागून असल्याने हा रस्ता खचण्याची शक्यता बेदंवाडी ग्रामस्थांकडून व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरचे खडीक्रशर तातडीने बंद करावे अशी मागणी या विभागातील तसेच बेदंवाडी ग्रामस्थांनी राज्य शासनाकडे केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(५) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने खडीक्रशर बंद करण्याबाबत तसेच खडीक्रशरचा बेकायदेशीर विस्तार करणाऱ्यांवर शासनाने काय कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(६) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) मौ.काटेवाडी (तारळे), ता.पाटण गावाच्या हद्दीत श्री.सदाशिव यशवंत जाधव यांनी ०.८३ हे.आर. क्षेत्राचे खरेदीपत्र केलेले असून, त्यापैकी ४० आर क्षेत्रामध्ये जिल्हाधिकारी, सातारा यांनी नोव्हेंबर, २०११ मध्ये ५ वर्षासाठी खाणपट्टा मंजूर केला आहे व त्या परवानगीनुसार ४० आर क्षेत्रामध्ये खाणपट्टा व क्रशर कार्यरत आहे.

(२) व (३) कोंजवडे ते बेदंवाडी हा रस्ता प्रधानमंत्री ग्रामसडक योजनेंतर्गत ऑगस्ट, २०१२ मध्ये पूर्ण करण्यात आला आहे हे खरे आहे.

मात्र बेदंवाडी ग्रामस्थांकडून सदर खडीक्रशरमुळे रस्ता खचण्याची शक्यता असल्याबाबत व खडीक्रशर बंद करण्याबाबत तक्रार प्राप्त झाल्याचे दिसून आले नाही.

(४), (५) व (६) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोकण कृषि विद्यापीठाच्या माध्यमातून कृषि पर्यटन योजना राबविण्याबाबत**

**(३८) * २७६९० श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **कृषी मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोकणास ७२० कि.मी. इतका समुद्र किनारा लाभला असून लाखो पर्यटक कोकणात येतात ही बाब विचारात घेवून कोकण कृषि विद्यापीठाच्या माध्यमातून कृषि पर्यटन योजना राबविण्याबाबत व त्यामध्ये स्थानिकांना सहभागी करुन घेण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्याचे सर्वसाधारण स्वरुप काय आहे व त्यावर किती निधीची तरतूद करण्यात आली आहे व त्याची सद्य:स्थिती काय आहे,

(३) असल्यास, कृषि पर्यटनाला चालना देवून स्थानिकांना त्यात सहभागी करुन घेण्याबाबत शासनाने काय कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१), (२) व (३) डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या माध्यमातून कृषि पर्यटन योजना राबविण्याबाबत व त्यामध्ये स्थानिकांना सहभागी करुन घेण्याबाबत शासन स्तरावर निर्णय घेण्यात आलेला नाही.

कृषि पर्यटनाला चालना देण्यासाठी केंद्र शासनाकडून प्राप्त झालेल्या निधीतून महाराष्ट्र पर्यटन विकास महामंडळाने जिल्हाधिकारी, सिंधुदुर्ग यांना उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली अंतर्गत प्रादेशिक फळ संशोधन केंद्र. वेंगुर्ले, जिल्हा सिंधुदूर्ग येथे आदर्श कृषि पर्यटन केंद्र स्थापन करण्यासाठी सन २०११-१२ व सन २०१४-१५ मध्ये एकूण रुपये १,५३,६०,९१६/- इतका निधी उपलब्ध करुन दिला आहे. त्यामधून आदर्श कृषि पर्यटन केंद्र उभारणीचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

डॉ.बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठाच्या माध्यमातून वेंगुर्ले येथील कृषि पर्यटन केंद्रात ३ ते ६ महिन्यांचा कृषि पर्यटन/ग्रामीण पर्यटन कार्यक्रम सुरु करण्यात येणार आहे. यात स्थानिक तसेच इतरही कृषिशी निगडीत शेतकरी/स्वयंसहाय्यता बचत गट यांच्यासाठी निवासी प्रशिक्षण वर्ग आयोजित करण्यात येणार आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**ता.श्रीगोंदा (जि.अहमदनगर) व ता.मोहोळ (सोलापूर) येथे अवैध उत्खनन व वाहतूक होत असल्याबाबत**

**(३९) * १७७६१ श्री.अस्लम शेख (मालाड पश्चिम), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), श्री.राहुल जगताप (श्रीगोंदा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.भास्कर जाधव (गुहागर), श्री.हनुमंत डोळस (माळशिरस), श्री.रमेश कदम (मोहोळ), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.वैभव पिचड (अकोले), श्री.राहूल कुल (दौंड) :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोलापूर जिल्ह्यातील भिमा व सीना नदीपात्रातून बेकायदेशीररित्या वाळू उपसा करुन त्याची वाहतूक करणारा ट्रक श्रीगोंदा तालुक्यातील हिरडगांव-चौफुला-आढळगांव येथे दिनांक २८ ते ३० मार्च, २०१५ या कालावधीत पकडला, हे खरे आहे काय,

(२) तसेच सोलापूर जिल्ह्यातील मोहोळ तालुक्यातील लिलाव झालेल्या रेतीच्या ठेक्यावरून वाळूचा उपसा सुरू असून वाळू भरून नेणाऱ्या वाहनांना ठेकेदार पावत्या देत नसल्याचे माहे मे, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीत काय आढळून आले व त्यानुषंगाने दोषी असणाऱ्या संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. एकनाथराव खडसे :** (१) अशी बाब निदर्शनास आली नाही. तथापि, श्रीगोंदा तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत.

(२) मोहोळ तालुक्यात वाळूगटाचा लिलाव झाला नसल्याने अशी बाब निदर्शनास आली नाही. तथापि, मोहोळ तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीची काही प्रकरणे दृष्टोत्पत्तीस आली आहेत.

(३) व (४) (अ) श्रीगोंदा तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या भरारी पथकाने सन २०१४-२०१५ मध्ये ७७ प्रकरणात रुपये २१,५१,७४५/- एवढा दंड वसूल केला असून, २६ गुन्हे दाखल केले आहेत.

(ब) मोहोळ तालुक्यात गौण खनिजाच्या अवैध उत्खनन व वाहतुकीस आळा घालण्यासाठी गठीत करण्यात आलेल्या भरारी पथकाने सन २०१४-१५ मध्ये १५ प्रकरणात रुपये ८.४५ लाख एवढा दंड वसूल केला असून, १० गुन्हे दाखल केले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. अनंत कळसे**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.